ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७


दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३१ | पुणे, बुधवार ४ मे, १९६६ | अंक ९






नित्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

## ठाकरसी फॅब्रिक्स्

फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

SANFORIZED

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड



THACKERSEY FABRICS

**ठाकरसी ग्रूप**

- धी हिंदुस्तान स्पिनिंग अँण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

TM-55 MR

# विविध माहिती

**जपानची भारताला मदत**—भारतामधील अन्नधान्याच्या टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन जपानच्या सरकारने २० लाख डॉलर्सची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. ह्या रकमेचा उपयोग करून जपानचे सरकार १० हजार टन तांदूळ ब्रह्मदेश व थायलंडकडून विकत घेऊन तो भारताला पाठविणार आहे. त्याशिवाय ८ हजार टन रासायनिक खतेही भारताला आदा करण्यात येणार आहेत. ही सर्व मदत जपानी रेड क्रॉस संघटनेमार्फत हिंदी रेड क्रॉस संघटनेच्या स्वाधीन करण्यात येईल.

**दुर्गापूर पोलाद कारखान्याला तोटा**—दुर्गापूर येथील पोलादाच्या कारखान्यात उत्पादनाला प्रारंभ झाल्यापासून आतापर्यंत १९·५१ कोटी रुपये तोटा झालेला आहे. गेल्या वर्षी मात्र कारखान्याला ५३·३३ लाख रुपयांचा अल्पसा नफा झालेला आहे. १९६५–६६ साली कारखान्याला पुन्हा काही तोटा सोसावा लागेल. कारण, त्याचा विस्तार करण्याच्या कामी पुन्हा काही भांडवल गुंतवावे लागत आहे. त्याशिवाय बोनस कायदा व वेतन मंडळाच्या शिफारसी अमलात आणण्यासाठी १ कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत.

**शेतीच्या साहित्याची आयात**—भारतामधील अन्नधान्याचे उत्पादन तातडीने वाढविण्याची गरज लक्षात घेऊन अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम ह्यांनी शेतीसाठी लागणाऱ्या सामग्रीची आयात अधिक निर्बंधरहित करण्याची सूचना नियोजन समितीला केली होती. नियोजन समितीने सूचना मान्य केली आहे. त्यामुळे आता खतांच्या व कीडप्रतिबंधक औषधांच्या निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल अधिक मोकळेपणाने आयात करण्यात येईल. त्याचप्रमाणे ट्रॅक्टर्स, औषधांचे फवारे मारणारी यंत्रे आणि खोदकामाची यंत्रे ह्यांच्याही आयातीवरील निर्बंध सैल करण्यात येतील.

**गोव्यातून माशांची निर्यात**—गोव्याजवळच्या समुद्रात सापडणाऱ्या एका प्रकारच्या स्वादिष्ट माशांची परदेशांना मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्यात येणार आहे. गोवा सरकारच्या मच्छीमार केंद्रांच्या शीतगृहात त्यांची साठवण करण्यात आली असून प्लॅस्टिकच्या छोट्या पेट्यांतून त्यांची रवानगी करण्यात येणार आहे. ह्या पेट्या बहुधा जपान व अमेरिका ह्या देशांना पाठविण्यात येतील. माशांच्या निर्यातीमुळे भारताला १·५ लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळेल.

**औरंगाबाद येथे सरकारी छापखाना**—औरंगाबाद येथे राज्य सरकारने स्थापन केलेल्या एका नव्या छापखान्याचे उद्घाटन करण्यात आले. छापखान्याच्या उभारणीसाठी ३·४५ लाख रुपये भांडवल लागले असून त्यात १२० तंत्रज्ञ नोकरांना काम मिळेल. त्याशिवाय २८ बिगरतंत्रज्ञांनाही रोजगारी मिळेल. राज्य सरकारने राज्यांतील सर्व सरकारी छापखान्यांचा विस्तार करण्याची एक योजना आखली असून ती टप्प्याटप्प्याने अंमलात आणण्यात यावयाची आहे.

**माणसाचे आयुर्मान वाढेल, पण?**—डॉ. हॅरी सोबेल ह्या अमेरिकन शास्त्रज्ञाने असे भाकित केले आहे की, भविष्यकाळात माणूस २०० अगर अधिक वर्षांपर्यंत जगू शकेल. मात्र इतक्या दीर्घ आयुष्यात त्याला मानसिक आरोग्य राखण्यासाठी फार प्रयत्न करावे लागतील. बहुतेकजणांना वृद्धावस्थेत काय करावे हे समजत नाही. सेवानिवृत्त होण्याचा धक्का त्यांना शारीरिक व मानसिक अशा दोन्ही दृष्टींनी जाणवतो. म्हणून आयुर्मान वाढले तरी परिस्थितीशी जमवून घेता येईलच असे नाही.

**धान्य उतरवण्याची यंत्रसामग्री**—स्वित्झरलंडने भारताला बोटीवरून धान्य उतरून घेणारी २० यांत्रिक अवजारे देणगी म्हणून दिली आहेत. त्यांपैकी १० अवजारे मुंबई बंदरात बसविण्यात येणार असून बाकीची १० कलकत्ता बंदरात उभारण्यात येणार आहेत. ह्या अवजारांच्या साह्याने दर तासाला ४० टन धान्य बोटीतून उतरवून घेता येते. ५ अवजारांचा पहिला हप्ता मुंबईला दाखल झाला आहे.

**पंजाबी तरवारींची निर्यात**—पंजाबमध्ये तयार करण्यात येणाऱ्या तरवारी अमेरिकेला निर्यात करण्यात येण्याची शक्यता आहे. पंजाब सरकारच्या निर्यात व्यापार मंडळाच्या संचालकाची एका अमेरिकन व्यापाऱ्याने गाठ घेतली व ह्यासंबंधी चर्चा केली. अमेरिका जपानकडून धनुष्यबाणांची आयात करीत आहे. मंडळाकडे आणखीही काही मालाच्या मागण्या अमेरिकेने नोंदविल्या आहेत.

**सीरिआला रशिआची मदत**—सीरिआमध्ये राज्यक्रांती होऊन तेथे डाव्या गटाचे सरकार अधिकारावर आले आहे. ह्या नव्या सरकारला रशियाने मदत देऊ केली आहे. मदतीसंबंधीच्या करारावर सही करण्यासाठी सीरिआचे मुख्य प्रधान स्वतः लेनिनग्रॅडला गेले होते. युफ्रेटिस नदीवर एक मोठे धरण बांधण्यासाठी मदत देण्यास रशियाने बांधून घेतले आहे. ही धरणयोजना सीरिआमधील सर्वांत मोठे विकासकार्य ठरण्याइतकी मोठी आहे. इजिप्तमधील आस्वान धरण बांधण्यात सहकार्य केल्यामुळे रशियाचे मध्यपूर्वेतील वजन वाढले आहे. सीरिआतील नव्या मदत कार्यामुळे ते आणखीच वाढेल.

**एअर इंडियाची उंच इमारत**—एअर इंडिया मुंबईत बांधणार असलेल्या एका भव्य व उंच इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ साजरा करण्यात आला. ही इमारत २४ मजले उंच होईल आणि तीत कंपनीच्या सर्व कचेऱ्या एकत्रित करण्यात येतील. सध्या कंपनीच्या अनेक ठिकाणी कचेऱ्या आहेत. सर्व इमारत सुखद हवामान राखणाऱ्या यंत्रणेने सिद्ध असेल. ती पुरी होण्यास ३ वर्षांचा अवधी लागेल. तिची उंची ३३६ फूट असेल, आणि उभारणीचा खर्च ४ कोटी रुपये होईल.

**नफा पाठविण्याची परवानगी हवी**—लंडन येथे इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सपुढे बोलताना आंतरराष्ट्रीय व्यापार सल्लागार सर नॉर्मन किपिंग म्हणाले की, भारतात भांडवल गुंतविणाऱ्या परदेशीय धंदेवाल्यांना नफा स्वदेशी पाठविण्याची परवानगी दिल्याशिवाय भारतात खाजगी भांडवलाच्या गुंतवणुकीची अपेक्षा करणे चुकीचे आहे. भारताची आर्थिक परिस्थिती सुधारणे शक्यतेच्या कोटीत आहे. लोकसंख्येचे नियमन आणि विविध उद्योगधंद्यांना ब्रिटनची मदत ह्या उपायांची आवश्यकता आहे.

**लठ्ठ मोटारहाक्यांना इशारा**—ग्लासगो शहरातील म्युनिसिपल वाहतुकीत ड्रायव्हर्सचे काम करणाऱ्या लठ्ठ नोकरांना नगरपालिकेने नोकरीवरून काढून टाकले जाण्याच्या शक्यतेबद्दल इशारा दिला आहे. वाजवीपेक्षा अधिक लठ्ठ असणाऱ्या ड्रायव्हर्सना गाडी चालविताना हृदयविकाराचा झटका येण्याचा अधिक संभव असतो, असे त्यांच्या वरिष्ठांचे मत आहे. अशा अंगाबाहेर असणाऱ्या ड्रायव्हर्सनी ३ महिनेपर्यंत आहारावर नियंत्रण ठेवून आपले वजन योग्य त्या पातळीवर आणले नाही, तर त्यांना दुसरी नोकरी पाहण्यास सांगितले जाईल असे बजावण्यात आले आहे.

# अर्थ

बुधवार, ४ मे, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शेतीच्या यांत्रिकीकरणाची कथा

हिंदमधील शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी ह्या व्यवसायाचे यांत्रिकीकरण घडवून आणणे अनिवार्य झालेले आहे ह्याबद्दल तज्ज्ञांत मतभेद राहिलेले नाहीत. परंतु भारतामधील शेतीला उपयुक्त ठरतील अशा प्रकारची आधुनिक अवजारे कोणती व कशा प्रकारची असावीत ह्यासंबंधी फारसा विचार आणि संशोधन झालेले नाही. ह्या प्रश्नाचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी १९६२ साली नियोजन-समितीने एका मंडळाची स्थापना केली होती. मंडळाचे अध्यक्ष श्री. ए. पी. जैन हे होते. मंडळाचा अहवाल आता तयार झाला असून त्यासंबंधी माहिती देताना श्री. जैन म्हणाले की, शेतीच्या अवजारांच्या उत्पादनाचा कार्यक्रम, त्यांच्याविषयीचे संशोधन आणि शिक्षण ह्या सर्वच बाबतींत पुनर्घटना करणे आवश्यक झालेले आहे. हिंदमधील लागवडीखाली असलेल्या जमिनींपैकी सुमारे एकतृतीयांश जमीन २५ एकरांपेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या तुकड्यांची आहे. इतक्या आकाराच्या शेतजमिनीसाठी मध्यम प्रतीच्या ट्रॅक्टरचा चांगला उपयोग होईल. त्यांचा वापर करण्यात आला तर अन्नधान्याच्या उत्पादनाला चांगली चालना मिळू शकेल. शेतीच्या तज्ज्ञांच्या मताने सुधारलेल्या शेतीच्या अवजारांचा उपयोग करण्यात आला तर उत्पादनात २५ पासून ३३ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकेल. तथापि, पहिल्या तीन पंचवार्षिक कार्यक्रमांत शेतीच्या सुधारलेल्या अवजारांच्या उत्पादनाकडे फारसे लक्ष देण्यात आले नाही. शेतीसुधारणेच्या कामात यांत्रिकीकरणाला मध्यवर्ती स्थान आहे. त्याचबरोबर खतांचा वापर, कीडनाशक द्रव्यांचा वापर, सुधारलेले बियाणे, जमिनीची सुधारणा, ह्यांनाही महत्त्व आहेच.

शेतीच्या यांत्रिकीकरणाबद्दलची, त्यातही ट्रॅक्टर्सच्या उत्पादनाबद्दलची व वापराबद्दलची, कथा फारशी संतोषजनक नाही. सध्या देशात ४० हजार ट्रॅक्टर्स वापरात आहेत. त्यांपैकी बहुतेक परदेशातून आयात केलेले असून सुट्या भागांच्या अभावी त्यांतील बरेचसे पडून आहेत. १९६१ ते ६४ ह्या कालावधीत अवघे ६,२०० ट्रॅक्टर्स भारतात बनविण्यात आले. वास्तविक ट्रॅक्टर्स बनविणाऱ्या कारखानदारांना ११ हजार ट्रॅक्टर्स बनविण्याचे परवाने देण्यात आलेले होते. ह्याच अवधीत सुमारे १५ हजार ट्रॅक्टर्सची परदेशातून आयात करण्यात आली. त्यांपैकी बहुतेक अर्धवट जुळविलेल्या स्थितीत आयात करण्यात आले व नंतर त्यांची पुन्हा पूर्ण जुळणी करण्यात आली. परदेशातून आयात केलेल्या संपूर्ण ट्रॅक्टर्सच्या किमतीपेक्षा अशा जुळविलेल्या ट्रॅक्टर्सच्या किंमती ४० टक्क्यांनी अधिक पडल्या. ट्रॅक्टर्स देशातल्या देशात बनविण्यासाठी व इतर अवजारांसाठी लागणारे लोखंड व पोलाद पुरेशा प्रमाणांत मिळू शकले नाही. शेतीच्या अवजारांच्या किमती खाली आणणे आवश्यक आहे. ह्या कामी राज्य सरकारांनी आपआपल्या राज्यांतील योग्य अशा कारखान्यांची निवड करावी आणि त्यांना खास प्रकारची अवजारे तयार करण्यास उत्तेजन द्यावे. अर्थात ही अवजारे तयार करण्याचे विशिष्ट ज्ञान त्यांना असले पाहिजे. डोंगराळ भागातील शेतकरी सुधारलेली अवजारे वापरण्यास फारसे उत्सुक दिसत नाहीत. म्हणून त्यांच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन त्यांना उपयोगी पडण्यासारखी नवीन प्रकारची अवजारे बनविणे अगत्याचे आहे. ह्या बाबतीत संशोधन करण्यास चांगला वाव आहे.

## अविकसित देशांना लष्करी मदत देण्यास विरोध

अमेरिकेच्या सीनेट परराष्ट्रीय संबंध समितीपुढे साक्ष देताना भारतामधील अमेरिकेचे माजी वकील मि. गालब्रेथ ह्यांनी कांही महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. आपल्या साक्षीत ते म्हणाले की, अमेरिकेने विकसनशील देशांना देण्यात येणाऱ्या लष्करी मदतीत मोठ्या प्रमाणावर काटछाट करावी. गेल्या पावसाळ्यात भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या युद्धाला अमेरिकेची लष्करी मदत कारणीभूत आहे. अमेरिकन सरकारच्या परदेशीय मदतीच्या धोरणाचा नवा कार्यक्रम सध्या विचाराधीन आहे. त्यासंबंधी आपले विचार व्यक्त करताना प्रा. गालब्रेथ पुढे म्हणाले की, अविचारपूर्वक दिलेल्या लष्करी मदतीचे परिणाम काय होतात ते आग्नेय आशियातील घडामोडीमुळे स्पष्ट झालेले आहे. ह्या भागात ज्या लढाया होत आहेत त्यांत आधुनिक शस्त्रास्त्रे वापरली जात आहेत. पण, ती वापरणारे सैनिक जरी धष्टपुष्ट असले तरी ज्या लोकांतून त्यांची भरती होते ते लोक मात्र निकृष्ट आहार घेणारे असतात. अमेरिकेने दिलेली मदत कम्युनिस्टांच्या विरुद्ध वापरली जावयाची होती असे सांगण्यात येते. पण, पाकिस्तानच्या बाबतींत तरी हे खरे ठरले नाही. तेथील लोकांनी ह्या शस्त्रास्त्रांकडे त्याची प्राचीन व मुरलेली वैरे उगवून घेण्याचे एक साधन म्हणूनच पाहिले. काश्मीरच्या प्रश्नासंबंधीची खरीखोटी बाजू तपासून पाहण्याचे कारण नाही. किंवा ह्या बाबतीत पाकिस्तानच्या हक्कांची दखल घेण्याचेही कारण नाही. पण इतके खरे की, अमेरिकेने पाकिस्तानला शस्त्रास्त्रे दिली नसती तर पाकिस्तानने ह्या प्रश्नांचा लष्करी उपायाने उलगडा करण्याचा प्रयत्न केला नसता आणि सगळ्यात मौज ही की, रशियाविरुद्ध वापरण्यासाठी दिलेली शस्त्रे तशीच राहिली आणि रशियानेच ह्या वादात तडजोड घडवून आणली.

## बडोदा बँकेची जॉर्ज टाऊन शाखा

दि बँक ऑफ बरोडाची जॉर्ज टाऊन (ब्रिटिश गियाना) येथील शाखा ३१ मार्च, १९६६ रोजी सुरू झाली. बरोडा बँकेची परदेशांतील ही १९ वी शाखा असून तिच्या एकूण शाखांची संख्या २५८ झाली आहे. जॉर्ज टाऊनमध्ये शाखा उघडणारी ही पहिलीच हिंदी बँक आहे. तेथे व्यापार करीत असलेली बरीच हिंदी लोकसंख्या आहे.

### ग्रामीण भागातील पाणीपुरवठा खेदजनक

भारत सरकारच्या अन्न, शेती आणि समाजविकास खात्याच्या एस्टिमेटस् कमिटीने आपल्या ९९ व्या अहवालात ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याच्या सद्यःस्थितीवर विदारक प्रकाश टाकला आहे. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या सोयींची पाहणी करण्यासाठी एक तज्ज्ञांची कमिटी नेमण्यात आली होती. तिने आतापर्यंत केलेल्या पाहणीवरून असे आढळून आले की, भारतातील एकूण खेड्यांपैकी २२ टक्के खेड्यांना अजूनही आरोग्यदृष्ट्या योग्य अशा पिण्याच्या पाण्याची काहीही सोय नाही. भारतामधील ७० टक्के जनता खेडोपाडी पसरलेली असल्याने जीवनाला अत्यंत आवश्यक असणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या चांगल्या सोयीच्या अभावी तिची किती दैन्यावस्था असेल त्याची कल्पनाच करावी लागेल. ह्या खेदजनक परिस्थितीचा परिणाम ग्रामीण जनतेच्या आरोग्यावर व पर्यायाने आर्थिक उत्पादनावर होत असणारच.

### अमेरिकेकडून सोयाबीन तेलाची आयात

वनस्पती तुपाच्या उत्पादनाची गरज भागविण्यासाठी भारत अमेरिकेकडून १,५०,००० टन सोयाबीनच्या तेलाची आयात करणार आहे. ही मदत पी. एल्. ४८० कराराखाली देण्यात येणार आहे. गेल्या १२ महिन्यांत वनस्पती तुपाची किंमत ३५ टक्क्यांनी वाढलेली आहे. शेंगदाण्याच्या तेलाच्या किंमतीत ४५ टक्के वाढ झाल्याने तुपाची किंमत वाढलेली आहे. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून शेंगदाण्याचे आणि शेंगदाण्याच्या तेलाचे उत्पादन वाढविणे, खाद्य तेलाच्या निर्यातीवर निर्बंध घालणे, त्याच्या तारणावर मिळणाऱ्या कर्जावर कडक नियंत्रण ठेवणे आणि सोयाबीनसारख्या खाद्य तेलाची आयात करणे हे धोरण स्वीकारण्यात आले आहे.

### हिंदी बनावटीच्या अणुभट्ट्या

ट्रॉंबे येथील अणुशक्ती मंडळाने अणुशास्त्राच्या तांत्रिक उपयोगाबाबत आतापर्यंत बरीच प्रगती केली आहे. ह्या तांत्रिक प्रगतीमुळे अणुभट्ट्यांचे नमुने व आराखडे तयार करून त्या-बरहुकूम अणुभट्ट्या उभारण्याचे काम मंडळाला करता येईल. मद्रास येथे स्थापन करण्यात यावयाच्या अणुभट्टीसंबंधीची सर्व एंजिनिअरिंग कामाची उभारणी सर्वस्वी भारतीय तंत्रज्ञांच्या साह्याने करता येणे आता शक्य होणार आहे. तथापि, ह्या बाबतीत एक बाब लक्षात घ्यावी लागेल. नव्या भट्ट्यांची उभारणी करतांना अनेक प्रकारची सूक्ष्म यंत्रसामग्री व उपकरणे भारतातच बनवावी लागतील, ह्याचा अर्थ असा की अणुभट्ट्यांची उभारणी करताकरताच तत्संबंधी जरूर ती औद्योगिक प्रगतीही साधण्यात आली पाहिजे.

### पाकिस्तानी आक्रमणाची खबर देणाराचा सन्मान

गेल्या वर्षी ४ ऑगस्ट ह्या दिवशी पहाटे सुमारे ८०० पाकिस्तानी छुपे हल्लेखोर जंगलाच्या आश्रयाने काश्मीरमध्ये घुसले. त्यांच्या ह्या आक्रमणाची माहिती महंमद दिन नावाच्या एका गुराख्याने कोणत्याही आमिषास न जुमानता पोलिस व लष्करी अधिकाऱ्यांना दिली. त्यामुळे वेळेवर उपाय योजणे शक्य झाले. ह्या गुराख्याचा राष्ट्रपतिभवनात सत्कार करण्यात येऊन त्याला पद्मश्री ही पदवी देण्यात आली. हल्लेखोरांनी सिगारेटस आणण्यासाठी त्याला दिलेली १० रुपयांची नोट युद्धस्मारक म्हणून जतन करण्यात आली आहे. काश्मीरच्या सरकारने महंमद दिनला ५ हजार रुपयांचे बक्षीस दिले आहे. ह्या रकमेचा उपयोग करून त्याने सफरचंदाची एक बाग विकत घेतली आहे.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–१८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | ११.९१ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १६.०८ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४३८.०२ ,, |
| खेळते भांडवल | ... | रु. | ४९०.७३ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.


स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले
" विजय " नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

### कुटुंबनियोजनाची मोहीम जोमाने चालविण्याची जरुरी

मध्यवर्ती सरकारचे नियोजन आणि समाजहित खात्याचे मंत्री श्री. अशोक मेहता ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ह्या संघटनेच्या पदवीदान समारंभप्रसंगी भाषण करताना म्हणाले की भारत हा देश आर्थिक दृष्ट्या मागासलेला आणि दाट लोकवस्ती असलेला आहे. अशा देशात कुटुंबनियोजनाच्या मोहिमेला प्राधान्य देण्यात येऊन दर हजारी जननाचे प्रमाण घटविणे ह्याला युद्धप्रयत्नाइतके महत्त्व आहे. परंतु ह्या कामी सर्व प्रकारच्या सामाजिक आणि मानसिक विरोधाला तोंड द्यावे लागते. शेकडो वर्षे चालत आलेल्या परंपरागत समजुती व त्यांनी जखडलेले जीवन ह्यांच्यामुळेच हा विरोध उगम पावलेला असतो. ह्या विरोधाचा निरास करण्यासाठी लोकांना शास्त्रीय दृष्टी आणि शिक्षण ह्यामुळे उत्पन्न होणाऱ्या मानसिक परिवर्तनास तयार करण्यात आले पाहिजे. कुटुंबनियोजन मोहिमेतील यशाची गती किती राहील हे अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. परंतु ४ थ्या पंचवार्षिक योजनेच्याअखेर जननसंख्येचे दर हजारी प्रमाण ३८.६ इतके कमी होईल असा अंदाज आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात आरोग्यावर २४८ कोटी रु. खर्च करण्यात आले. चौथ्या कार्यक्रमात ५७८ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. पिण्याच्या पाण्याची सोय व आरोग्य संवर्धनाच्या योजना ह्या कामांसाठी तिसऱ्या कार्यक्रमात १३१ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. ४ थ्या कार्यक्रमात ह्या कामावर ३७१ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. वैद्यकीय मदतीवरील खर्चातही वाढ करण्यात यावयाची आहे.

### उद्योगधंद्यातील चलनवृद्धीबद्दल इशारा

एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. नवल एच्. टाटा ह्यांनी संघटनेच्या ३३ व्या वार्षिक सभेत बोलताना देशातील प्रचलित आर्थिक परिस्थितीविषयी सरकारला धोक्याचा इशारा दिला आहे. आपल्या भाषणात ते म्हणाले की चलनवृद्धी आणि त्याचा वेतनावर होणारा विपरीत परिणाम ह्यांची दखल सरकारने गंभीरपणे घेतली पाहिजे. नाहीतर सर्व अर्थव्यवस्था धोक्यात सापडल्याशिवाय राहणार नाही. राहणीच्या खर्चात सतत होणाऱ्या वाढीवर आतापर्यंत एक साधा उपाय योजण्यात येत आहे. महागाईभत्त्यात यांत्रिक पद्धतीने वाढ करून ह्या प्रश्नाला तोंड देण्यात येत आहे. परंतु अशा प्रकारच्या तात्कालिक आणि वरवरच्या उपायांनी हा प्रश्न सुटण्यासारखा नाही. अशा प्रकारच्या उपायांचा काही उपयोग न होता अनेक देशांत आर्थिक घडी विस्कटून गेल्याची उदाहरणे आहेत. आर्थिक नियोजन आणि संरक्षण ह्या दोन्ही क्षेत्रांत होणाऱ्या अनुत्पादक खर्चामुळे चलनवृद्धीचा विलक्षण दाब निर्माण झालेला आहे. उद्योगधंद्यावर तर ह्या खर्चाचा असह्य ताण पडलेला आहे. गुजरात, महाराष्ट्र आणि मद्रास ह्या राज्यांतील कापड गिरण्यांची सद्यःस्थिती ह्या ताणाचे स्पष्टपणे दिसणारे उदाहरण आहे. ज्या उद्योगधंद्यांना नफा होत नाही त्यांनाही कामगारांना किमान बोनस द्यावयास लावणे अन्याय्य आणि असमंजसपणाचे आहे. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यांत देण्यात येणाऱ्या वाजवीपेक्षा अधिक सुट्या रद्द करण्यात आल्या पाहिजेत. अशा सुट्यांमुळे राष्ट्रीय उत्पादन घटते. म्हणून जादा सुटी जाहीर करण्यापूर्वी सुटीमुळे होणारी उत्पादनांतील घट भरून काढण्यात आली पाहिजे असा आदेश देण्यात आला पाहिजे. रविवारी अगर पुढच्या सुटीच्या दिवशी काम करून घटलेले उत्पादन भरून काढले पाहिजे.

### नागार्जुनकोंडा येथील प्राचीन संग्रहालय

आंध्र प्रदेशातील नागार्जुनकोंडा येथील कृष्णा नदीवरील धरण बांधून पुरे झाले म्हणजे त्या विस्तीर्ण जलाशयात भारताच्या प्राचीन संस्कृतिमधील एक महत्त्वाचा भूभाग बुडून जाणार आहे. मात्र ह्या भागात विपुलतेने सापडणाऱ्या प्राचीन ऐतिहासिक अवशेषांचे जतन करण्यासाठी एक भव्य वस्तुसंग्रहालय बांधण्यात आले आहे. एका बेटावर उभारण्यात आलेले भारतामधील हे पहिलेच वस्तुसंग्रहालय आहे. नागार्जुन हा एक प्रख्यात बौद्ध आचार्य म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. धरणाच्या पायाचा दगड पंतप्रधान पं. नेहरू ह्यांच्या हस्ते १९५५ साली बसविण्यात आला होता. प्राचीन इतिहासातील वस्तूंचे जतन करण्याची कल्पना त्यांचीच आहे. १९५९ साली वस्तुसंग्रहालयाची पायाभरणी करण्यात आली. आता ते बांधून पुरे झाले आहे.

### नेहरू स्मारक विश्वस्त निधीची मंद प्रगती

नेहरू स्मारक निधीसाठी २० कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. परंतु आतापर्यंत अवघे १ कोटी रुपये जमा झालेले आहेत. पंजाब, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि बिहार ह्या राज्यांकडून निधीसाठी अद्याप काहीच वर्गणी आलेली नाही. आंध्र प्रदेशाचे उद्दिष्ट १.३० कोटीचे आहे. प्रत्यक्ष जमा १८ लाख; मद्रासचे उद्दिष्ट १.५० कोटीचे आहे. प्रत्यक्ष जमा २ लाख; महाराष्ट्राचे उद्दिष्ट २ कोटीचे आहे. प्रत्यक्ष जमा १७ लाख; केरळचे उद्दिष्ट ५० लाख आहे. प्रत्यक्ष जमा १३ लाख. उद्योगपतींच्या एका कमिटीने ५ कोटी रु. निधी जमविण्याची आश्वासने दिली होती. परंतु आतापर्यंत कमिटीकडून काहीही निधी पाठविण्यात आलेला नाही.

### शेती विद्यापीठांसाठी ७ कोटी रुपयांची मदत

म्हैसूर राज्याचे शेतकी मंत्री श्री. नारायण गौडा अमेरिकेचा दौरा करून परत आले. त्यांनी आपल्या दौऱ्यात फोर्ड व रॉकफेलर फौंडेशनच्या अधिकाऱ्यांशी आणि अमेरिकेच्या मदत कार्यक्रमाबद्दल संबंधितांशी चर्चा केली. भारतातील ७ शेती विद्यापीठांना अमेरिकेकडून ७ कोटी रुपयांची मदत मिळू शकण्याचा संभव आहे असे त्यांनी सूचित केले आहे. श्री. गौडा ह्यांनी ब्रिटन, जपान, फिलिपाइन्स ह्या देशांचाही दौरा केला. फिलिपाइन्समध्ये एका नव्या प्रकारच्या भाताची लागवड केली जाते. ह्या भाताची लावणी निश्चित पाणी पुरवठा असेल तर वर्षातून तीन वेळा करता येते आणि त्याचे एकरी पीकही बरेच येते. बंगलोर येथील शेती विद्यापीठाच्या जमिनीत ह्या भाताची लागवड प्रयोग म्हणून करण्यात येणार आहे.

### हृदय विकाराच्या कारणांचे निदान

उत्तर मुंबईत लॉयन्स क्लबपुढे भाषण करताना डॉक्टर एन्. जे. शहा म्हणाले की हृदय विकाराला अनेक बाजू असून त्याला कारणीभूत होणाऱ्या कारणांपैकी काही अद्याप अज्ञात आहेत. आधुनिक जीवनात सारखी धावपळ करावी लागते. त्यामुळे शहरातील जीवनातील गती विलक्षण वाढलेली आहे. शिवाय, उद्योगाला वेळ नेहमीच अपुरा पडतो. त्यामुळे जीवनावर अतिशय ताण पडतो आणि हृदयविकार जडण्यास अनुकूल अशी परिस्थिति निर्माण होते. आपला आहार आणि व्यायाम ह्यांचाही ह्या रोगाशी संबंध आहे. माणसाचे हृदय हा स्नायूंने बनविलेला एक अवयव आहे. तो सुस्थितीत राखण्यासाठी अशा इतर अवयवांप्रमाणेच त्यालाही नियमित व्यायामाची आवश्यकता असते.

### बँकेच्या शाखाधिकाऱ्यांसाठी एक प्रश्न

'युको टॉवर' मध्ये यु. क. बँकेने आपल्या मॅनेजरांना उद्देशून एक प्रश्न विचारण्यात आला असून सर्वांत मुद्देसूद उत्तराला ५० रु. चे बक्षीस जाहीर केले आहे. प्रश्न असा आहे:—

भारत ट्रेडिंग कंपनीचा सोल प्रोप्रायटर लाला हरिराम ह्याने तुमच्या शाखेकडे १५,००० रुपयांचा क्लीन ॲडव्हान्स मागितला आहे. तो स्वतः आणि त्याची पत्नी ह्यांच्या जोड नावाने आपल्या शाखेत ३ वर्षांच्या मुदत ठेवीत ३०,००० रुपये ठेवण्यास, ह्या ठेवीचे तारणावर कर्ज मिळणार असेल तर, तयार आहे.

बँकेला जनरल लीन आहेच, म्हणून मुदत ठेवींची पावती डिसचार्ज करून ती शाखेच्या स्वाधीन करण्याची त्याला आवश्यकता वाटत नाही. लाला हरिरामचा अर्ज मंजूर करावा काय? कर्ज मंजूर केलेच, तर ते सिक्युअर्ड समजावे की अन् सिक्युअर्ड? 'इंटर-बँक ॲग्रीमेंट ऑन मिनिमम रेट्स ऑफ इंटरेस्ट ऑन ॲडव्हान्सेस' प्रमाणे कर्जावर व्याजाचा दर काय राहील?

---

### कोचीन येथील तेलशुद्धीचा कारखाना

कोचीन येथे उभारण्यात आलेल्या तेलशुद्धीच्या कारखान्याची चाचणी जूनच्या प्रारंभी होण्याची शक्यता आहे. जून महिन्यात इराणकडून ३० हजार टन अशुद्ध तेल घेऊन येणारी एक बोट कोचीनच्या धक्क्याला लागेल. चाचणी पुरी झाल्यावर जुलैपासून रीतसर उत्पादनास प्रारंभ होईल. ह्या तेलशुद्धीच्या कारखान्यात दरसाल २५ लाख टन पेट्रोलजन्य पदार्थ निर्माण करणारी यंत्रसामग्री बसविण्यात आली असून ती चालविण्यासाठी ३०० तंत्रज्ञ लागतील. ह्या तंत्रज्ञांत १२ जण परदेशीय आहेत. हे सर्व साह्य अमेरिकन कंपनीने पुरविलेले आहे. हिंदी तंत्रज्ञांना शिकवून तयार करण्याचे काम मुंबई येथे चालू आहे. कोचीन येथील कारखाना २०० एकर जमिनीवर पसरलेला आहे. त्याच्या उभारणीसाठी २२ कोटी रुपये खर्च आला आहे.

---

### डिझेलवर चालणारी 'वृंदावन' एक्सप्रेस

मद्रासहून बंगलोरला जाणाऱ्या 'वृंदावन' एक्सप्रेसला प्रथमच वाफेच्या एंजिनाच्या ऐवजी डिझेल-विजेवर चालणारे एंजिन जोडण्यात आले. त्यामुळे ह्या दोन शहरांतील अंतर कापण्यास नेहमीपेक्षा १ तास कमी वेळ लागला आणि प्रवासही संथ गतीचा झाला. धुराचा त्रासही अर्थातच झाला नाही. हा प्रवास ५ तासांपेक्षाही कमी वेळात होण्याची शक्यता आहे. एंजिन अमेरिकन बनावटीचे असून त्याची अश्वशक्ती २,६०० आहे. वाफेच्या एंजिनामुळे गाडीला बसणारे धक्के नव्या एंजिनामुळे बसत नाहीत. ते थोड्याच अवधीत दर तासाला ४० मैल गती घेऊ शकते. काही ठिकाणी तर गाडी ६० मैल वेगानेही धावू शकली.

---

### संततिनियमन कुणात लोकप्रिय नाही?

सिलॉन जिल्ह्यातील सहा इस्पितळांतून जमा केलेल्या आकडेवारीवरून दिसून येते, की मुसलमान आणि ख्रिस्ती समाजांत संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया लोकप्रिय नाही. शस्त्रक्रिया करवून घेणाऱ्या स्त्री-पुरुषांत निरक्षरांचा भरणा फक्त ७% होता; एकूण लोकसंख्येत ४९% लोक निरक्षर आहेत. ह्यावरून साक्षर नसलेल्यांत संततिनियमनाच्या प्रचाराला खूपच वाव आहे, हे दिसून आले.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
### मुंबई

(दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित)

**: मुख्य कचेरी :** ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. टेलिफोन नं. २५५४७४-७५, २५६२१४, २५४७८१

**: विभागीय कचेरी :** महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ५,६५,६६,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | १,७५,५५,००० |
| ठेवी | ... रु. | ४३,८६,६३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,००,८६,८१,००० |

**: शाखा :**

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. शु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

"चिरमुले निकेतन", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा-शहर

*दि. १८-३-६६ पासून ठेवींवरील व्याजांच्या दरांत खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.*

### मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शे. | ६=२५ |
| २ वर्षे | " | ६=५० |
| ३ वर्षे | " | ६=७५ |
| ५ वर्षे | " | ७=२५ |
| ७ वर्षे | " | ७=५० |
| ९ वर्षे व जास्त | " | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खाते:—दि. १-२-६५ पासून ४ टक्के

*तसेच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याही शाखेत अधिक माहिती मिळू शकेल.

## आमदार श्री. शंकरराव उर्फ काकासाहेब महादेव भेलके बी. ए.



पुणे जिल्ह्यातील एका कर्तबगार समाजकार्यकर्त्याचे चरित्र आम्ही वाचकांपुढे ठेवतो. असे हे कर्तबगार व आदरणीय कार्यकर्ते म्हणजे आमदार शंकरराव महादेव भेलके, की ज्यांची कर्मभूमी सह्याद्रीच्या खोऱ्यातील भोर व वेल्हेमहाल ही आहे. श्री. शंकरराव यांचा जन्म पूर्वीच्या भोर संस्थानच्या राजधानीत इनामदार पाटील घराण्यात सन १९१५ साली झाला. त्यांचे आई वडील गरीब स्वभावाचे, मायाळू, प्रेमळ व परोपकारी होते. ह्यामुळे बालपणीच काकांचे मनावर चांगले संस्कार झाले. अशा परिस्थितीत पहिल्याने श्रीशिवाजी हायस्कूल पुणे मधून त्यांनी मॅट्रिकपर्यंत मजल मारली. सर परशुरामभाऊ कॉलेजमधून ते बी. ए. झाले.

गरीबीतून आल्यामुळे गरीबांविषयी नित्याची कळकळ हा स्वभावधर्मच बनतो. त्या वेळी बी. ए. झाल्यावर कारकुनी मिळविणे अशक्य नव्हते. परंतु मनाचा कल नोकरी म्हणजे गुलामगिरी असा असल्यामुळे व अंतःकरणाचा ओढा समाजसेवेकडे असल्यामुळे काकासाहेबांनी समाजकार्यालाच वाहून घेतले.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात प्रजापरिषदा स्थापन झाल्या व त्यामध्ये श्री. भेलके यांनी भाग घेऊन हालअपेष्टा सहन केल्या. पुढे भोर संस्थानाचे विलिनीकरण झाले. भोर तालुका व वेल्हेमहाल मागासलेला, आर्थिक परिस्थिती हलाखीची, शिक्षणात जैसे थे, अशा परिस्थितीत एक तरुण रक्ताचा, बहुजनसमाजाचा अभिमानी श्री. शंकरराव भेलके यांनी तालुक्यांत व वेल्हेमहालात सार्वजनिक कार्यास वाहून घेतले.

उपजत शिक्षणाची गोडी व बुद्धिमत्तेने आणि कर्तव्याने अष्टपैलू अशा या भोरवासीयास पहिल्या जिल्ह्याच्या स्कूल बोर्डाचा सभासद होण्याचा मान मिळाला. पुढे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होण्याचा मान श्री. शंकरराव भेलके यांना मिळाला. त्यांनी जिल्हा लोकल बोर्डाचा कारभार ५ वर्षे अत्यंत कुशलतेने हाकला व मोठमोठी समाज–उपयोगी कामे केली ( सन १९५२ ते १९५७ ). त्यांनी बांधलेली सध्याची जिल्हापरिषदेची इमारत ही त्यांच्या कर्तबगारीची साक्षच आहे. त्यांनी केलेल्या जिल्हा विकास मंडळात चिटणिसाचे काम ही एक आणखी त्यांना जिल्ह्याच्या उन्नतीची संधीच मिळाली.

त्यांचा पुणे जिल्ह्याचा अभ्यास एवढा दांडगा की, पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या पंचवार्षिक योजनांत कोणती कामे आवश्यक आहेत, प्रत्येक तालुक्यातील खेड्यापासून तो तालुका गावापर्यंत सर्व आराखडे व उणीवा त्यांच्या तोंडपाठ आहेत.

भोर व वेल्हेमहाल या कर्मभूमीत श्री. भेलके यांची काम करण्याची तळमळ, आत्मीयता, आत्मविश्वास व लोकांच्या मनावरील पकड, आपुलकी, लोकांशी समरस होऊन अडीअडचणी जाणून घेण्याची पद्धत, समजूतदारपणा, न्यायबुद्धी या सर्व गुणांमुळे आम जनतेने प्रेमभराने १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पुणे जिल्ह्याच्या भोर मतदार संघातून महाराष्ट्र विधान सभेवर निवडून दिले.

श्री. काकासाहेब भेलके यांचा सहकारी चळवळीवर विश्वास आहे. सहकाराशिवाय शेतकऱ्यांच्या अडीअडचणींची सोडवणूक होणार नाही, म्हणून भोर व वेल्हेमहालात प्रत्येक गावी सोसायट्या स्थापन करून शेतकऱ्यांच्या अडीअडचणींची थोड्या–फार अंशाने सोडवणूक केली. त्यातून भांडवल उभारून भोर तालुका वेल्हेमहाल खरेदी विक्री संघ स्थापन करून शेतीकारिता उपयुक्त वस्तू, बी बियाणे व खते देऊन तसेच सहकारी धान्य दुकान भोर येथे उघडून जनतेची सोय केली. सोसायट्यांच्या मार्फत तालुक्यात व महालात धान्यवाटप सुरू केले.

भोर येथील श्रीछत्रपती शिवाजी टेक्स्टाइल वर्क्स को. ऑ. स्पिनिंग मिल. ही सुताची सहकारी पद्धतीने संपूर्ण मजुरांनी चालविलेली भारतातील पहिलीच सूतगिरणी काढण्यात त्यांनी सुरुवातीपासून खूपच मेहनत घेतली. आज त्या मिलच्या बोर्डाचे ते व्हा. चेअरमन आहेत.

सुरू होणाऱ्या सहकारी भातगिरणीची कामे आज भोर व नसरापूर येथे चालू आहेत. सरकारची प्रत्येक स्कीम भोर व वेल्हे महालात राबविण्याची अहर्निश, अंतःकरणात लागलेली चिंता, कितीही अडचणी आल्या तरी त्यांतून मार्ग काढणे व त्यावर मात करणे हेच त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य.

भोर व वेल्हेमहालात दुधाचे उत्पादन मोठे, त्यामुळे त्यांनी सहकारी पद्धतीवर दूध संघ स्थापन केला आहे. त्यासाठी पश्चिम जर्मन सरकारने भोर तालुक्यात मोफत मदत म्हणून दिलेली २,६५,००० रुपयांची दूधडेअरीउपयुक्त अशी माशिनरीही भारत सरकारमार्फत मिळविण्याची तळमळ की ज्याच्या सोयीमुळे दोन्ही तालुक्यांतील दूध उत्पादन वाढून शेतकऱ्यांचा फायदा होईल. ह्या दूधसंघाचे ते चेअरमन आहेत.

भोर व वेल्हेमहालातून वाहणाऱ्या नद्या, ओढे यांचेवर बंधारे बांधून घेणे, पडिक जमिनींचे टेरिसिंग करून घेणे, जादा जमीन उत्पादनाकरिता आणणे, जमिनींस पाणीपुरवठा व्हावा म्हणून लिफ्ट इरिगेशन स्कीम मोठ्या मोठ्या नद्यांवर घेऊन शेतकऱ्यांच्या जमिनीस पाणी देता यावे या उद्योगाकडे सध्या काकांचे लक्ष लागलेले आहे. पाहिजे तितक्या वेळा गावी जाऊन व शेतकऱ्यांना सांगून नद्यांच्या पाण्याचा उपयोग शेतीस कसा करून घेता येईल याची जाणीव त्यांनी नदीकाठच्या शेतकऱ्यांस करून दिली आहे व ह्या कार्यात ते सध्या मग्न आहेत. यामुळे जवळ जवळ ५–६ हजार एकर जमीन पाण्याखाली येणार आहे.

श्री. काकांचे कार्यक्षेत्र नुसते वेल्हेमहालापुरतेच संकुचित नसून जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रांतही ते अग्रणी आहेत.

पुणे जिल्हा सहकारी भू-विकास बँक पुणे, ही बँक सन १९६० मध्ये लिक्विडेशनमध्ये निघण्याची शक्यता होती. श्री. भेलके यांनी पुढे येऊन या बँकेची धुरा खांद्यावर घेऊन या बँकेकरिता रात्रंदिवस प्रयत्न करून मागच्या चार वर्षांत पूर्वीचा तोटा

मरून काढलाच, परंतु बँक फायद्यात आणून दाखविली व संबंध महाराष्ट्र राज्यात पहिल्या प्रतीची बँक म्हणून आज तिचा नावलौकिक बँकेच्या व्यवहारात व वसुलीच्या बाबतीत होत आहे.

या बँकेचे ते चेअरमन आहेत. त्यांनी स्वतः बँकेच्या कारभारात लक्ष घालून बँकेस उच्च पदास नेऊन पोहोचविले. त्याचे सर्व श्रेय काकांनाच आहे.

पुणे जिल्ह्यात त्यांच्याविषयी आपुलकी निर्माण झालेली आहे. त्यात कै. आण्णासाहेब आवटे व श्री. आमदार मामासाहेब मोहोळ, उपमंत्री ना. शंकरराव पाटील, श्री. अण्णासाहेब मगर यांचेबरोबर काम करण्याची संधी मिळाली. पहिली जोडी कै. आण्णासाहेब व काका यांनी जिल्ह्याच्या कारभाराची गाडी व्यवस्थित हाकली, त्यानंतर मामा व काका ही जोडी कामगिरी अत्यंत यशस्वी रीतीने हाकीत आहेत, हे विसरता येणार नाही.

श्री. काकांचा दररोजचा उद्योगाचा व्याप एवढा मोठा आहे. असा हा अष्टपैलू, निःस्वार्थी, विधायक कार्यकर्ता क्वचितच पाहावयास मिळतो. त्याचे मुख्य कारण अंतःकरणाची तळमळ म्हणून "काका" हे नाव लहानापासून थोरापर्यंत सर्वतोमुखी आहे.

---

## तारापूर येथील अणुविद्युतकेंद्राची उभारणी

मुंबईच्या उत्तरेला उभारण्यात येत असलेल्या तारापूर अणुविद्युतकेंद्राचे काम १९६८च्या अखेरीस पूर्ण होऊन विद्युदुत्पादनास प्रारंभ होईल अशी अपेक्षा आहे. ह्या केंद्रात ३८० मेगॅवॅट वीज उत्पन्न केली जाईल व तिचे वाटप करण्यात येईल. भारताचे अणुशक्ती मंडळ केंद्रासाठी लागणारे जड पाणी तयार करण्याचा एक कारखाना स्थापन करण्याच्या विचारात असून त्यासाठी जागा निवडण्याचे प्रयत्न सध्या चालू आहेत. अशा दोन-तीन जागांचा विचार चालू आहे. ज्या जागेच्या जवळपास स्वस्त कोळसा व मुबलक पाणी मिळू शकेल त्या जागेची निवड होण्याची अर्थातच अधिक शक्यता आहे. संकल्पित कारखान्यात २०० टन जड पाणी तयार करण्यात येईल. तारापूर कारखान्याच्या उभारणीत शक्य तितक्या प्रमाणात हिंदी तज्ज्ञांच्या ज्ञानाचा व त्यांनी तयार केलेल्या यंत्रसामग्रीचा उपयोग करण्यात येईल.

---

## अंधांची संख्या भारतात सर्वांत अधिक

भारत सरकारच्या आरोग्य खात्याने अलीकडेच केलेल्या एका पाहणीवरून असे आढळून आले आहे की, हिंदमधील अंधांची संख्या ४३·९ लाख इतकी मोठी, म्हणजे जवळ जवळ मुंबईच्या लोकसंख्येइतकी आहे. जगातील अंधांची संख्या सुमारे १·४ कोटी असून त्यापैकी एक चतुर्थांश लोक भारतामधील आहेत. हिंदमधील प्रत्येक १०० लोकांमागे एक जण आंधळा असतो. जगातील लोकसंख्या व अंध ह्यांचे प्रमाण १ लाख लोकांत ४५० आंधळे असे आहे. इजिप्त व आफ्रिकेतील काही भाग सोडता भारतामधील अंधत्वाचे प्रमाण इतर देशाच्या मानाने सर्वांत अधिक आहे. इजिप्तमधील अंधांचे प्रमाण जास्त असण्याचे कारण तेथील वाळवंटी प्रदेशातून हवेत पसरणारे सूक्ष्मतम वाळूचे कण हे आहे. भारतामधील बऱ्याच लोकांचे अंधत्व निकस आहारातून उगम पावलेले असते.

---

## डॉक्टोरेट पदवीधरांचा उद्योगधंद्यांत अल्प उपयोग

शिक्षणाचा उपयोग प्रत्यक्ष उत्पादनाच्या कामी झाला पाहिजे ही दृष्टी आता बळावत चालली आहे. त्यातही शास्त्रीय विषयांच्या पदवीधरांच्या बाबतीत ही अपेक्षा अधिकच उचित अशी म्हणावी लागेल. पण व्यवहारात मात्र अगदी वेगळी परिस्थिती आहे. शास्त्रीय आणि तांत्रिक काम करण्याची पात्रता असलेल्यांची जी यादी करण्यात आली आहे तीवरून ही गोष्ट उघड दिसून येते. शास्त्रीय विषयांतील डॉक्टोरेटची पदवी संपादन केलेल्यांची भारतामधील संख्या सुमारे ७,५०० आहे. म्हणजे १० शास्त्र-पदवीधरांत १ डॉक्टोरेट पदवी मिळविलेला असतो. पण ह्या तज्ज्ञ लोकांचा उद्योगधंद्यांत फारच कमी उपयोग करण्यात येतो. त्यांच्यापैकी अवघे ६·४ टक्के पदवीधर उद्योगधंद्याशी संबंधित असलेले संशोधन अगर तांत्रिक काम करीत आहेत. बहुतेक शास्त्र-पदवीधर शिक्षण संस्थांतून अगर सर्वसामान्य संशोधन संस्थांतून नोकऱ्या करीत आहेत. सुमारे ८० टक्के पदवीधर ह्या क्षेत्रात सामावलेले आहेत. रोजगाराच्या दृष्टीने विचार करता ५·६ टक्के पदवीधर उत्पादक उद्योगधंद्यात गुंतलेले आहेत. त्यापैकी ४·५ टक्के खाजगी मालकीच्या विभागात आणि १·१ टक्के सार्वजनिक विभागात काम करीत आहेत. ५८ टक्के शास्त्र-पदवीधर शिक्षण संस्थांतून नोकऱ्या करीत आहेत. औद्योगिक रोजगारीच्या दृष्टीने पाहता १२·५ टक्के पदवीधर रासायनिक संघटनांतून आणि ९·२ टक्के पदवीधर सरकारी कचेऱ्यांतून काम करीत आहेत. डॉक्टोरेटची पदवी घेतलेल्यांत अधिक संख्या रसायनशाखेतील पदवीधरांची आहे. त्यांची टक्केवारी १६·९ अशी आहे. त्यांच्याखालोखाल गणित तज्ज्ञांची संख्या आहे. त्यांचे टक्केवारीत प्रमाण ३·८ टक्के आहे. ह्याचा अर्थ, शास्त्रीय ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग अत्यंत निकृष्ट पातळीवर आहे असाच होतो.

---

## १० वर्षांत वस्तूंच्या किमतीत ८० टक्के वाढ

दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील १० वर्षांच्या अवधीत किंमतीच्या सार्वत्रिक पातळीत ८० टक्के वाढ झालेली आहे. फक्त दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळाचाच विचार केला तर ही पातळी ३५ टक्क्यांनी उंचावली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ती आणखी ३२ टक्क्यांनी वाढलेली आहे. १९६६ च्या मार्चपर्यंत केलेल्या घाऊक किमतीच्या पाहणीवरून ही गोष्ट उघड दिसून येते. १९५२-५३ मधील सर्व वस्तूंच्या किमतीचा निर्देशांक १०० धरून वाढणाऱ्या निर्देशांकाचा विचार केला तर १९६०-६१ साली तो १२४·८ पर्यंत वर चढलेला दिसतो. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे हे शेवटले वर्ष-तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील असे. ज्या वर्षी म्हणजे १९६५-६६ साली निर्देशांक १६५ पर्यंत वाढ...

---

**अन्नाच्या खरेदीसाठी कर्ज**—भारताला अन्नाची खरेदी करता यावी म्हणून डेन्मार्कच्या परराष्ट्रीय मंत्र्यांनी भारताला ३ कोटी क्रोनर अथवा १६ लाख पौंड कर्ज देण्याची सूचना केली आहे. ह्या कर्जावर व्याज घेण्यात येणार नसून ते परत करण्याचा प्रारंभ ५ वर्षांनी करावयाचा आहे. त्यानंतर १५ वर्षांत त्याची फेड करावयाची आहे. अविकासित देशांना कर्ज देण्याच्या बाबतीत जे नियम आहेत त्यात बदल केल्याशिवाय डेन्मार्कला हे कर्ज देता येणार नाही. सध्याच्या नियमांप्रमाणे अन्न विकत घेण्यासाठी विकासोन्मुख देशांना कर्ज देता येत नाही.

## पी. एल्. ४८० फंड

### स्टेट बँकेतून रिझर्व्ह बँकेत संपूर्णतः वर्ग झाले

स्टेट बँकेचे चेअरमन, श्री. व्ही. टी. देहजिया ह्यांनी बँकेच्या वार्षिक सभेतील आपल्या भाषणात एका गोष्टीचा जाताजाता उल्लेख केला, ती म्हणजे पी. एल. ४८० कौंटरपार्ट फंड स्टेट बँकेकडे ठेवीत जमा होण्यास ऑक्टोबर १९५६ मध्ये प्रारंभ झाला होता, ते पुढे स्टेट बँकेतून रिझर्व्ह बँकेकडे हप्त्याहप्त्याने वर्ग करण्यात येऊ लागले आणि आता त्या फंडाचा लवलेशही स्टेट बँकेकडे उरलेला नाही.

ऑक्टोबर १९५६ नंतरच्या साडेचार वर्षांत ह्या फंडाच्या रूपाने स्टेट बँकेत ३३८ कोटी रुपयांच्या ठेवींची भर पडली. आपल्या ठेवीत पडत असलेल्या भरीचा स्टेट बँक गौरवाने उल्लेख करीत असे. अंदरकी बात वेगळीच होती, म्हणजे हे फंडच ठेवीत मोठी भर घालीत होते. फक्त १९५९ साली, एकदा, बँकेने कबूल केले की, ठेवीतील भरघोस वाढीचे प्रमुख कारण हे आयते अमेरिकन फंड होत. पण हे फंड केवढी मोठी भर घालीत होते, हे बँकेने कधीच प्रकट केले नाही.

जुलै, १९६० पासून हे फंड रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करण्यास प्रारंभ झाला. एकाच वेळी हे फंड वर्ग केल्याने स्टेट बँकेला अडचण भासली असती, म्हणून दरसाल हप्त्याहप्त्याने ते फंड वर्ग करण्यात येऊ लागले. सर्व फंड वर्ग होण्यास पाच वर्षे लागली.

साहजिकच त्यामुळे स्टेट बँकेकडील ठेवीत फारशी वाढ दिसेना. तेव्हा, पी. एल्. ४८० कौंटरपार्ट फंड रिझर्व्ह बँकेकडे वर्ग केले, ते वगळून ठेवीतील वाढ दाखविण्यात येऊ लागली. हिशेबातील अचूकपणाबद्दल एवढी आस्था, ह्या फंडामुळे पूर्वी ठेवीत भराभर वाढ होत गेली, तेव्हा मात्र दाखविण्यात आली नाही !

इंपीरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर स्टेट बँक अस्तित्वात आली, तेव्हा बँकेतील काही ठेवी काढून घेतल्या जातील अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. त्याच सुमारास पी. एल्. ४८० कौंटरपार्ट फंड स्टेट बँकेकडे जमा होऊ लागले. त्यामुळे स्टेट बँकेच्या चालकांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. ह्या फंडाच्या रकमेचा आकडा जाहीर केला असता तर स्टेट बँकच्या प्रगतीबद्दल लोकांचे मत कदाचित फारसे अनुकूल झाले नसते, असे त्या गुप्ततेचे समर्थन करता येईल. स्टेट बँक प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करू लागल्यानंतर ह्या गौप्यस्फोट करण्यात धोका उरला नाही.

स्टेट बकेच्या वार्षिक सभेचे आधी पत्रकार परिषदेत श्री. दहेजा ह्यांनी १९६० नंतरचेच फक्त आकडे दिले. त्या आधीच्या आकड्यांबाबत अजूनही गुप्तता का राखण्यात येत आहे, ह्याचे कारण कळत नाही.

---

### गेल्या वर्षांत २२५ कोटी रु. चा काळा पैसा बाहेर आला

काळा पैसा बाहेर काढण्यासाठी मध्यवर्ती सरकारने गेल्या वर्षी कित्येक योजना आखल्या. पोलीस छापे आणि तपासण्या ह्यांनी कित्येक व्यापारी घाबरले, तशी जे आपण होऊन काळा पैसा जाहीर करतील त्यांना सरकारने सवलती देऊ केल्या. स्वेच्छेने बाहेर काढलेली रक्कम, सुवर्ण रोख्यांत गुंतवणूक आणि नॅशनल डिफेन्स रेमिटन्स योजना, ह्यांचे द्वारा एकूण २२५ कोटी रुपयांचा काळा पैसा बाहेर आला, असे समजते. अजून दडून राहिलेला काळा पैसा कमी नाही.

### बद्रिनाथ-केदार मंदिरे

केदारनाथ मंदिर यात्रेकरूंसाठी २८ एप्रिल रोजी खुले झाले. बद्रिनाथ मंदिर ६ मे रोजी उघडण्यात येईल.

---

### ग्वाल्हेर राजवाड्याचे हिल्टन होटेल होणार

ग्वाल्हेरच्या मुंबईमधील राजवाड्यात आता एक आलिशान होटेल उघडण्यात येणार आहे. त्यासाठी ४ कोटी रुपये खर्च येईल. त्यात ४०० खोल्या असतील. म्हणजे, प्रत्येक खोलीस १ लक्ष रु., असा हिशेब झाला. भांडवलापैकी बराच मोठा हिस्सा हिल्टन्स देणार आहेत. करापूर्वीच्या नफ्यापैकी ३३% नफा त्यांना मिळेल. विदेशी कंपनीच्या सहकार्याने निघणाऱ्या होटेलच्या ह्या योजनेस सरकारने मान्यता दिली आहे. होटेल सुरू होण्यास तीन वर्षे लागतील.

---

### हॅमबुर्ग बंदरात मांजरांचा उपयोग

पश्चिम जर्मनीमधील हॅमबुर्ग हे बंदर त्या देशांतील सर्वांत मोठे बंदर आहे. जगांत त्याचा ५ वा क्रमांक लागतो. सध्या बंदरांत अन्नपदार्थांची चढउतार फार मोठ्या प्रमाणावर होत असल्याने उंदरांचा सुळसुळाट झाला आहे. त्यांचा बंदोबस्त न केल्यास धान्य व इतर अन्नपदार्थ ह्यांचे खूप नुकसान होण्याचा संभव आहे. ह्यावर उपाय म्हणून बंदराच्या अधिकाऱ्यांनी १० हजार मांजरे पाळण्याचे ठरविले आहे. इतकी मांजरे बंदर विभागांत फिरू लागल्यावर उंदरांचा नाश करण्याचे काम बिनबोभाट पार पडेल असे त्यांना वाटते. हॅमबुर्ग हे पश्चिम जर्मनीतील एक घटक राज्य असून राज्य सरकारने आपल्या अंदाजपत्रकात मांजरांना मांस आणि दूध पुरविण्यासाठी खास रकमेची तरतूद केली आहे.

---

### जाहिरात-उत्पन्नाच्या दृष्टीने प्रमुख अमेरिकन मासिके आणि साप्ताहिके

(१९६४ चे आकडे)

| | डॉलर्स |
|---|---|
| १ टाइम | १,५३,८१,२१० |
| २ बिझिनेस वीक | ८५,६३,९४९ |
| ३ लाइफ | ८१,६४,७९९ |
| ४ सॅटर्डे ईव्हिनिंग पोस्ट | ७३,९४,८४३ |
| ५ लुक | ६६,१०,३१० |
| ६ न्यूजवीक | ६१,००,५७९ |
| ७ यू. एस. न्यूज | ५८,८०,६२६ |
| ८ रीडर्स डायजेस्ट | ५०,५३,२०८ |
| ९ फॉरच्युन | ३७,७४,१४७ |
| १० फोर्बेस | ११,२०,२५६ |

### प्रमुख अमेरिकन कंपन्यांचा जाहिरातखर्च

(१९६४ चे आकडे)

| | डॉलर्स |
|---|---|
| १ फोर्ड मोटार कंपनी | ५२,३३,७१७ |
| २ जनरल मोटर्स कॉर्पोरेशन | २७,३४,५०९ |
| ३ क्राइसलर कॉर्पोरेशन | २२,७९,११३ |
| ४ अमेरिकन टेलिफोन अँड टेलिग्राफ कं. | २०,४४,०९७ |
| ५ जनरल टेलिफोन अँड इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन | १९,३३,९४६ |
| ६ ऑलिन मॅथीसन केमिकल कॉर्पोरेशन | १७,८७,६०१ |
| ७ यु. एस. स्टील कॉर्पोरेशन | १५,२१,७१७ |
| ८ शेल ऑइल कं. | १४,८३,०१० |
| ९ जनरल इलेक्ट्रिक कं. | १३,७५,७८१ |
| १० न्यूयॉर्क लाइफ इं. कं. | १२,४७,४९० |

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०१

( १ ) बचत खाते :—व्याजाचा : दर द. सा. द. शे. रु. ४=००

( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

*अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर






स्वयंपूर्णता हेच राष्ट्राचे खरे सामर्थ्य ! शेती, उद्योगधंदे इत्यादींचे उत्पादन वाढवून देश स्वयंपूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक माणूस आज प्रयत्नशील राहिला पाहिजे. म्हणून आजची घोषणा—

## अधिक श्रम-अधिक उत्पादन

संचालक प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.